अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# मोदींचे भाषण एक परिणाम अनेक

भारतीय जनतेला ज्या तीन गोष्टींची देशाच्या नेतृत्वाकडून अपेक्षा होती ती नरेंद्र मोदी यांनी निदान आपल्या भाषणातून तरी दाखवून दिली आहे. एक म्हणजे राजकारण, दुसरे समाजकारण आणि तिसरे राष्ट्रकारण. दुर्दैवाने आतापर्यंत केवळ राजकारण होत राहिले. समाजकारण आणि राष्ट्रकारण पूर्णपणे हद्दपार केले गेले. उलट समाजकारण आणि राष्ट्रकारणाचा राजकारणासाठीच कसा वापर करता येईल असाच प्रयत्न होत राहिला. नरेंद्र मोदी यांनी संसद इमारतीच्या आपल्या पहिल्या भाषणातून या तीन क्षेत्रांचा स्वतंत्रपणे उल्लेख केलेला आहे. किंवा त्याची नोंद घेतली आहे. एकतर त्यांनी महत्त्वाचा मुद्दा असा मांडला की सरकारचे प्राधान्य काय असले पाहिजे. याचे सुतोवाच त्यांनी केले.त्यांच्याच भाषेत सांगायचे तर सरकार वह हो जो गरीबों के लिये सोचे, गरीबोंकी सुने, गरीबों के लिये जिए, नई सरकार गरींबो के लिये समर्पित है। या त्यांच्या वाक्यातून त्यांना जे राजकारण करायचे आहे ते समाजकारणासाठीच करायचे आहे, हे स्पष्ट होते. याच भाषणामध्ये त्यांनी आपल्याला मिळालेला विजय हा केवळ एक राजकीय विजय नाही. या विजयाने जशा देशातील सामान्य माणसाच्या अपेक्षा उंचावल्या आहेत तशा अनेक देशांच्यादेखील भुवया उंचावल्या आहेत.

जागतिक पातळीवर भारताचा सन्मान वाढण्यासाठी हे सरकार प्रयत्नशील राहील. हे त्यांचे उद्‌गार राष्ट्रकारणाची साक्ष देते. आज ही तर अत्यंत निकडीची गोष्ट आहे की देशातील सर्वसामान्य जनता महागाईसारख्या प्रश्नाने अक्षरश: रोजगाराच्या प्रश्नाने भांबावलेली आहे. गरिबी, दारिद्र्य हे खरोखरच भारतासारख्या देशासमोरील सर्वात मोठे पश्न आहेत याचा विचार केवळ अर्थकारणाच्या चष्म्यातून करता येणार नाही. तर त्यासाठी राष्ट्रकारण आणि समाज कारणाचाच विचार करावा लागेल. नरेंद्र मोदी यांचे संसद इमारतीतल्या आगमनापासून तर त्यांच्या भाषणाच्या शेवटच्या क्षणापर्यंत अनेक गोष्टींचे परिणाम पहायला मिळाले आहेत. थोडक्यात सांगायचे तर त्यांचे हे एकच भाषण अनेक परिणाम साधणारे ठरणार आहे. आता त्याचे अर्थ कोण कसे लावतात हा भाग निराळा, परंतु स्वत: मोदी यांनी ज्या क्रमाने एकेका विषयाचा भाषणात उल्लेख केला त्यावरून एक गोष्ट निर्विवादपणे पुढे येते ते म्हणजे त्यांना केवळ राजकारण किंवा सत्ताकारण करायचे नाही.स्वत:ला मिळालेल्या या सत्तेमधून काहीतरी साध्य करून दाखवायचे आहे.

### विनम्रतेचे भान कायम

अनेकांना असे वाटू शकेल की नरेंद्र मोदी पहिल्यांदाच दिल्लीच्या राजकारणात आले आहेत. पंतप्रधान होत असल्यामुळे त्यांच्यामध्ये किंवा त्यांच्या भाषणामध्ये काही गोष्टींचा नवखेपणा असू शकेल. या गोष्टी जरी गृहीत धरल्या तरी एवढे मोठे निर्विवाद बहुमत मिळूनही मोदी यांनी आपल्या बोलण्यातली विनम्रता सोडलेली नाही. कुठेही सूडबुध्दीचा विचार नाही. पूर्वग्रह ठेवून आरोप प्रत्यारोप नाहीत. अगदी या भाषणाचा राजकीय अर्थ जरी काढायचे म्हटले तरी त्यातही त्यांनी आपले कौशल्य पणाला लावलेले दिसून येते.

निवडणूकपूर्व ज्या पक्षांशी युती केली होती त्या सर्वांचा तितक्याच कृतज्ञतेने त्यांनी उल्लेख केला. अगदी चंद्राबाबू नायडू किंवा उध्दव ठाकरे यांच्याशीसुध्दा सभागृहामध्ये तितक्याच सहजतेने त्यांनी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. त्या प्रत्येकाचे विजयातले श्रेय त्यांनी त्यांना देऊ केले. त्याच भाषणात त्यांनी यापूर्वीच्या सरकारांनी केलेल्या कामांबाबत उल्लेख करून त्यांच्याविषयी एका अर्थी आदरच दाखवला. यापूर्वीच्या सरकारांनी जी चांगली कामे केली असतील ती अधिक चांगली करण्याचा प्रयत्न आपले सरकार करेल हे त्यांचे वाक्य पूर्णपणे राजकीय स्वरुपाचे ठरते.

कोणतीही कटूता न ठेवता यापूर्वीच्या सरकारांच्या कामाचे माप त्यांनी या एका वाक्यातून त्यांच्याच पदरात टाकले.मोदी यांच्या यशाचे अनेक पैलू सांगितले जातात.त्याचे एकमेव कारण म्हणजे ते ज्याठिकाणी ट्रीक्स वापरायच्या असतील तिथे ट्रीक्स वापरतात आणि ज्याठिकाणी खरोखरच पॉलिटिक्स करायचे असेल तिथे पॉलिटिक्स करतात.आपल्या स्वपक्षातल्या राजकारणाविषयी ते तितकेच जागरुक होते. अडवाणींविषयी त्यांनी अत्यंत नम्रपणे पेललेला उल्लेख किंवा त्यांच्याविषयी भावनाशील होऊन त्यांनी व्यक्त केलेली कृतज्ञता हा अशाच एका ट्रीक्सचा भाग ठरतो. तर माझ्या पक्षांध्यक्षांनी जबाबदारी सोपवली होती ती १० मे रोजी पूर्ण झाली आणि मी त्याचा अहवाल त्यांना प्रत्यक्ष भेटून सादर केला ही गोष्टदेखील अशाच मोदी ट्रीक्सची कला ठरते. त्याशिवाय सामान्य माणसाने आपल्यावर विश्वास दाखवला आहे. या राष्ट्रासाठी आपणही काही करून दाखवले पाहिजे. हे त्यांचे वाक्य त्यांच्याबरोबर निवडून आलेल्यांना आणि अन्य घटक पक्षांसाठी दिलेला राजकीय संदेश ठरते.

### नेता, कार्यकर्ता आणि सत्ता

आपल्या मराठीमध्ये एक वाक्प्रचार नेहमी वापरला जातो. एखाद्याने एकाच प्रयत्नात अनेक परिणाम साधले असतील तर एका दगडात दोन पक्षी मारले असे म्हणून त्याचा उल्लेख केला जातो. मोदींनी याच पध्दतीने एकाच भाषणात अनेक परिणाम साधले आहेत. सुरुवातीला संसद इमारतीत प्रवेश करताना त्यांनी त्या भव्य वास्तुच्या पायरीला अक्षरश: डोके टेकून नमस्कार केला.या एका कृतीतून त्यांच्यातील विनम्रतेचे लोकांना दर्शन घडले. पूर्ण बहुमत मिळालेला एखादा सत्ताधारी जर अशा प्रकारच्या नम्रतेचे भान ठेवत असेल तर ती गोष्ट निश्चितच दखल घेण्यासारखी ठरते. जी गोष्ट राजकारणामध्ये दुर्मीळ झालेली आहे सत्ता आणि पैशाची अशी काही मस्ती पहायला मिळते की त्याचे आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही.

भाषणामध्ये अडवाणींनी केलेल्या एका शब्दप्रयोगाचा उल्लेख करून त्यांनी हीच विनम्रता दाखवली. अडवाणी म्हणजे मोदींची कृपा आहे. परंतु मोदी यांनी त्याची तितक्याच संवेदनशीलतेने दखल घेतली आणि भारतमातेची सेवा ही मुलाचे कर्तव्य असते. याच्याबरोबरीने अत्यंत महत्त्वाचा उल्लेख मोदींनी केला. की मिळालेला हा विजय केवळ माझ्या एकट्याचा नाही तर जनसंघापासूनच पाच पिढ्यांनी केलेल्या तपश्चर्येचे फळ आहे. आणि त्या सर्वांना आपण अभिवादन करतो. हे त्यांचे वाक्यदेखील त्यांच्यामधील विनयशीलता दाखवते. मोदींचे भाषण भाजपातील नेता कार्यकर्ता आणि सत्ता या तीनही गोष्टींना समान पातळीवर आणणारे होते हे लक्षात घ्यावे लागेल.